अस्मिता मोगरा

दूरभाष : २८२२३६३२

को. ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड

(रजिस्टर नं.: बी. ओ. एम./ एच. एस. जी./ ५३३८, दि. २३-०३-७८)

कार्यालय: इमारत क्र. ३, श्री दत्त जगदंबा मंदिर मार्ग, अंधेरी (पूर्व) मुंबई-४०००९३


जावक क्र.:O/Feb-20/06. दिनांक: 24.02.2020.

**(Displayed on Notice Board on 24/2/2020, Distributed to Members & Put on Web-Site).**

## विशेष सर्वसाधारण सभेची सूचना व विषय पत्रिका.
## फक्त सभासदांसाठी.

**सर्व सभासदांना कळविण्यात येत आहे की, अस्मिता मोगरा को.ऑ.हा. सोसायटीची विशेष सर्वसाधारण सभा रविवार दिः १.३.२०२०, रोजी संध्याकाळी ठीक ४.00 वाजता इमारत क्रः ४ समोरील मोकळया जागेत आयोजित करण्यात आली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहून, सभेचे कामकाज व्यवस्थित पार पाडण्यास सहकार्य करावे, ही विनंती.**

**सभेपुढील विषय :**

**१. संस्थेच्या कार्यकारिणी निवडणूकीबाबत सूचना**

कार्यकारिणीचा ५ वर्षाचा कालावधी ३0.0३.२०२० रोजी समाप्त होत असून नवीन कार्यकारिणीची नियुक्ती करण्यासाठी उप-निबंधकांच्या आदेशानुसार घेण्यात येण्रया निवडणूकीसंदर्भातील माहिती देणे.

**२.पुनर्विकास प्रक्रियेबाबत माहिती देणे.**

पुनर्विकास प्रक्रियेच्या वाटचालींचा आढावा घेउन या प्रक्रियेअंतर्गत पुढील योजनेबाबत विचार विनिमय करून त्यावर निर्णय घेणे.

**३.इमारतींच्या दुरूस्तीबाबत :**

इमारतींच्या दुरूस्तीबाबत P.M.C. च्या सल्यानुसार दुरूस्ती करून घेणे अथवा इमारतींच्या गच्च्यांवर ताडपत्रीचे छप्पर टाकून तात्पुरती उपाययोजना करणे. याबाबत चर्चा करून निर्णय घेणे.

वरील दोन्ही उपाययोजनांचा इमारतनिहाय खर्चाचा तक्ता सोबत देण्यात आला आहे. सभासदांनी त्याचा अभ्यास करून सभेत त्याबाबत निर्णय घ्यावा.

**४. संस्थेवर गुदरण्यात आलेल्या विविध कोर्ट खटल्याची सद्यःस्थितीची माहिती देणे.**

**५. सुरक्षा व्यवस्थेवरील वाढीव G.S.T. संदर्भातील निवेदन.**

**विशेष सुचना :**

**१ : सभेसाठी गणपूर्ति न झाल्यास तहकूब सभा अर्ध्या तासाने, त्याच दिवशी, त्याच ठिकाणी घेण्यात येईल. त्यासाठी गणपूर्तिची आवश्यकता असणार नाही.**

**२ : कोणा सभासदाला काही प्रश्न, शंका, सूचना विचारावयाच्या असतील तर त्या संस्थेच्या कार्यालयात सभेच्या तारखेपूर्वी तीन दिवस आधी पोहोचतील अशा बेताने, गुरूवार दि: २७.२.२०२० रोजी दुपारी १.00 वाजेपर्यंत लेखी पाठवाव्यात. त्यानंतर येणाऱ्या पत्रांचा विचार केला जाणार नाही. सादर केलेले प्रश्न, शंका, सूचना या सभेच्या विषयाबाबतच असाव्यात.**

**३ : शक्य झाल्यास सभेचे ध्वनीचित्रिकरण केले जाईल.**

**आपला विश्वासू ,**

**मा. सचिव.**

कार्यकारिणी मासिक सभा दि. १५.२.२०२० मधे एकमताने झालेल्या निर्णयानुसार.

सोबत : **दुरूस्ती अथवा गच्च्यांवर छप्पर घालणे या बाबतचा तक्ता.**